# प्रेसनोट

दि. 11/10/2019

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची अवैध दारु वाहतुकीवर धडक कारवाई

मा.श्री.दिक्षीत गेडाम, पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग व मा.श्री.तुषार पाटील, अपर पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग यांनी आगामी निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर जिल्हयातील अवैध दारु धंदे व वाहतुक यांचेवर कडक कारवाई करण्यासाठी आदेश दिलेले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडुन अवैध दारु धंद्यांविरुदध मोहीम सुरु आहे. अवैध दारु वाहतुक रोखण्यासाठी मोहीम राबवित असताना दि.10/10/2019 रोजी सकाळी 05.30 वाजताचे सुमारास वेंगुर्ला पोलीस ठाणे हददीत महिंद्रा बोलेरो मध्ये 7,20,000/- किंमतीची गोवा बनावटीची दारु व महिंद्रा बोलेरो 6,00,000/- असा एकुण 13,20,000/- किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला. वाहन चालक हेमंत महत्तर,रा.मालवण यास ताब्यात घेण्यात आले असुन वेंगुर्ला पोलीस ठाणे येथे आरोपीविरुदध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

मा.श्री.दिक्षीत गेडाम, पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग व मा.श्री.तुषार पाटील, अपर पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील, पोलीस उपनिरीक्षक शेळके, पोलीस हवालदार गगावणे, पोलीस हवालदार सावंत, पोलीस नाईक धुरी, पोलीस नाईक वालावलकर, पोशि पालकर, पोशि सरमळकर यांनी सदर कारवाई केली.

दिक्षीतकुमार गेडाम<br>
पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग